


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड – महाराष्ट्र | बुधवार दि. ०६ मे २०२६ | वर्ष ६ वे | अंक ४७ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com




# चना खरेदीस 29 मे पर्यंत मुदतवाढ

## धनंजय मुंडेंची मागणी केंद्र सरकारने केली पूर्ण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात चना (हरभरा) खरेदीस शासकीय खरेदी केंद्रावर १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, तसेच पोर्टलवर याबाबत नोंद करण्यात मुदतवाढ देण्यात यावी या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीस थेट केंद्र सरकारने मान्यता दिली असून शासकीय हमीभाव चना खरेदी केंद्रांवर आता २९ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. २९ एप्रिल पर्यंत नाफेड द्वारा संचालित शासकीय केंद्रांवर चना खरेदीस शासनाने दिलेली मुदत २४ एप्रिल रोजीच ऑनलाइन नोंदी बंद करून शासनाने थांबवली




होती. याबाबत उत्पादक शेतकऱ्यांनी विनंती केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राज्याचे पणन मंत्री



जयकुमार रावल यांच्या सह केंद्र सरकारला लेखी पत्राद्वारे विनंती करुन शासकीय केंद्रांवर किमान १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती केली होती. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी याबाबत आज अधिकृत घोषणा केली असून आता चना

**● मुदतवाढ मागितली १५ मे पर्यंत, शिवराज सिंह चौहान यांनी मुदतवाढ दिली २९ मे पर्यंत**

(हरभरा) उत्पादक शेतकऱ्यांना आपला चना २९ मे पर्यंत ऑनलाइन नोंदी करून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर विक्री करता येणार आहे. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी आ. धनंजय मुंडे यांच्या सह केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले आहेत.







# इंधनाचा दुष्काळ; बीडमध्ये सात पंप कोरडे

## रखरखत्या उन्हात झाली जनतेची होरपळ; दुचाकीस्वारांनी रात्र काढली जागून

**बीड । प्रतिनिधी**

डोक्यावर सूर्य आग ओकतोय, कपाळावरून घामाच्या धारा वाहत्यात, अन् इथं गाडीत थेंबभर पेट्रोल टाकायला दोन तास झालं रांगेत उभा हाय. घरात पोराबाळांना घेऊन रुग्णालयात निघालो होतो, पण गाडी इथंच अडकली. शहरातल्या सात पंपावर जाऊन आलो, पण सगळीकडं पाटी 'नो स्टॉक'ची. आता या रांगेत नंबर कधी येणार आणि आम्ही घरी कधी जाणार, हे त्या देवालाच ठाऊक! बीडच्या रखरखत्या उन्हात, हातातील मळकट रुमालाने घाम पुसत एका वैतागलेल्या दुचाकीस्वाराने काढलेले हे आर्त उद्गार शहराची विदारक व्यथा मांडणारे आहेत. ४२ अंशावर गेलेला



उन्हाचा पारा आणि त्यात पेट्रोल-डिझेलसाठी लागलेल्या लांबच लांब रांगांनी सोमवारी बीडकरांच्या नाकी नऊ आणले. टंचाईच्या अफवेमुळे अनेकांनी अतिरिक्त साठा करण्याचा प्रयत्न केला. शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या महामार्गांच्या साधारण १० किलोमीटरच्या परिघात १० प्रमुख पेट्रोल पंप आहेत. मात्र, सोमवारी यातील तब्बल ७ पंपांवर इंधनाचा पूर्णपणे ठणठणाट होता. इंधन उपलब्ध असलेल्या अवघ्या ३ पंपांवर वाहनांच्या रांगा थेट महामार्गाच्या मधोमध आल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक ते बार्शी रोडचे तंत्रनिकेतन महाविद्यालय, शिवाजी महाराज चौक ते चऱ्हाटा फाटा आणि छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते काकू-नाना रुग्णालय हे शहरातून जाणारे प्रमुख महामार्ग आज वाहनांच्या रांगांनी व्यापले होते. पेट्रोल भरण्यासाठी किमान एक ते दीड तास वाट पाहावी लागत असल्याने प्रवाशांचे हाल झाले. विशेषतः दुचाकीवरील महिला, लहान मुले उन्हाच्या काहिलीने कासावीस होऊन महामार्गाच्या कडेला असलेल्या झाडांच्या सावलीचा आधार घेताना दिसत होते. तेल उत्पादक कंपन्यांकडूनच अपुरा पुरवठा- इंधन टंचाईचे मूळ ▶▶ उर्वरित पान २ वर

# "पेट्रोलसाठीची धावपळ ठरली जीवघेणी!"; टँकर-दुचाकीच्या भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू




**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील औरंगपूर येथील विवेक सुधीर रानमारे (वय २७ वर्षे) या तरुणाचा दुचाकीसाठी पेट्रोल आणायला गेलेला असताना अपघात होऊन मृत्यू झाला. रविवारी (दि. ३ मे) रात्री ११ वाजेच्या सुमारास आंबा साखर कारखाना परिसरातील पेट्रोल पंपावरून ▶▶ उर्वरित पान २ वर

# घाटनांदूरमध्ये कुलरमध्ये पाणी भरताना विजेचा लागून तरुणाचा मृत्यू



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील घाटनांदूर येथे मंगळवारी सकाळी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर कुलरमध्ये पाणी भरत असताना विजेचा तीव्र धक्का लागून नजीर खदीर सय्यद या २६ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना सकाळी साडेआठच्या सुमारास घडली असून यामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारा कर्ता पुरुष अचानक गेल्याने सय्यद कुटुंबाचा आधार कायमचा हिरावला गेला आहे.नजीर हा नेहमीप्रमाणे सकाळी कामावर जाण्याच्या तयारीत असताना घरातील लोखंडी ▶▶ उर्वरित पान २ वर

# परळीतील डायमंड फुटवेअर कारखान्याला भीषण आग

## लाखोंचे नुकसान, अग्निशामक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील रेहाना नगर परिसरात असलेल्या डायमंड फुटवेअर कारखान्याला काल पहाटे सुमारे ३:१५ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत कारखान्यातील मोठ्या प्रमाणावर कच्चा माल, मशिनरी तसेच चप्पलांचे तयार साठे जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे



नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कारखान्यात चप्पलांचे मोठे गोडाऊन असून त्यामध्ये पेपर बॉक्सचा मोठ्या प्रमाणावर साठा होता. त्यामुळे आग काही क्षणातच भडकली आणि संपूर्ण परिसरात पसरली. आगीच्या तीव्रतेमुळे कारखान्यातील यंत्रसामग्रीही पूर्णपणे नष्ट झाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाला ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड हादरलं! धारूरमध्ये पोलिसांवर भीषण दगडफेक; पोलीस उपनिरीक्षक भवर जखमी

**● मध्यरात्री पेट्रोलिंगदरम्यान कर्तव्य बजावत असलेल्या पोलिस पथकावर मद्यधुंद टोळक्याचा हल्ला**

**● पेट्रोलिंगदरम्यान संशयास्पद हालचाली, पोलिसांकडून थांबवण्याचा प्रयत्न**

**● संतप्त झालेल्या टोळक्याने पोलिसांवरच दगडफेक केली**




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील धारूर येथे गुन्हेगारांना पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर आरोपींनी भीषण दगडफेक केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात पोलीस उपनिरीक्षक भवर हे जखमी झाले असून परिसरात तणावाचे वातावरण आहे. मध्यरात्री पेट्रोलिंगदरम्यान कर्तव्य बजावत असलेल्या पोलिस पथकावर मद्यधुंद टोळक्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर थोडक्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

# ८ लग्न पचवले, नवव्या लग्नात तरुणीचे बिंग फुटले

## बीडमध्ये नवऱ्या मुलाकडून लाखो लुटणाऱ्या नवरीसह एजंटाला बेड्या

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यात बोगस लग्न लावणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. विशेष म्हणजे, आठ लग्न पचवल्यानंतर नवव्या लग्नावेळी या वधुचे बिंग फुटले आणि पोलिसांच्या बेड्या पडल्या. बीड जिल्ह्यात बोगस लग्न लावून देणारी टोळी सक्रीय असल्याचं समोर आल आहे. यापूर्वीही ग्रामीण भागातील अनेक तरुणांची फसवणूक या बोगस लग्न लावणाऱ्या टोळीने केली आहे. मात्र, ▶▶ उर्वरित पान २ वर

# इयत्ता सहावीच्या नवीन अभ्यासक्रमाला मंजुरी

## जूनपासून लागू होणार नवा आराखडा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात शालेय शिक्षण क्षेत्रात मोठा बदल घडणार असून इयत्ता सहावीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्याला (चरहरीरिर्हीर उश्ररींी ६ डूश्रश्ररर्लीी उहरपसश) राज्यस्तरीय सुकाणू समितीने मंजुरी दिली आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. याआधी इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या




अभ्यासक्रमाला मंजुरी देण्यात आली होती. आता सहावीचाही अभ्यासक्रम नव्याने तयार करण्यात आला असून येत्या जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून तो लागू केला जाणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी निश्चित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित हा आराखडा तयार करण्यात आला असून त्याला सुकाणू समितीने मंजुरी दिली आहे. यानंतर अभ्यासक्रम समन्वय समितीकडून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर नवीन पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाईल. ▶▶ उर्वरित पान २ वर



# खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून प्रवाशांची लूट !

राज्यात सर्वत्रच्या शालेय आणि महाविद्यालयीन परीक्षा संपून विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी लागली आहे शिवाय सध्या लगीन सराईसुद्धा सुरु आहे त्यामुळे मुंबई ठाणेसारख्या शहरांत राहणारे अनेक जण कुटुंबासह आपल्या गावी जाण्यासाठी निघाले आहेत. नेहमीच्या रेल्वेगाड्यांसह सुट्टीनिमित्त सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वेगाड्याही दुथडी भरून वाहताना दिसत आहेत. राज्यातील अनेक रेल्वे स्थानके प्रमुख शहरांत बांधण्यात आल्याने खेड्यापाड्यांत जाण्यासाठी बस किंवा खासगी वाहनाने जाण्याशिवाय पर्याय नसतो. एसटीचे जाळे राज्यभर विणलेले आहे. आज एसटी खेड्यापाड्यासह दुर्मिळ भागांतही पोहोचली आहे त्यामुळे या दिवसांत सर्वाधिक पसंती दिली जाते ती एसटीला. सुट्टीच्या दिवसांत महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ जादा गाड्या सोडते मात्र शहरांतील वाढलेल्या लोकसंख्येमुळे या जादा गाड्याही आधीच फुल्ल होऊन जातात. अशावेळी सामान्य माणूस वाट धरतो ती खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांची. एसटीप्रमाणे खासगी कंपन्यांच्या बसगाड्याही आज खेड्यापाड्यापर्यंत जात आहेत शिवाय यांमध्ये स्लीपर, पुश बॅक सीटर, एसी यांसारख्या लक्झरी सुविधा दिल्या गेल्याने कुटुंबासह लांबच्या आणि रात्रीच्या प्रवासासाठी त्या आरामदायी ठरतात. मात्र या खासगी बसगाड्यांचे तिकीटदर सुट्टीच्या दिवसांत दुप्पट ते तिप्पट झालेले असतात. अन्य कोणताच पर्याय शिल्लक नसल्याने प्रवासी नाईलाजास्तव या ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून चढ्या दराने तिकीट खरेदी करतात. शालेय सुट्या, सार्वजनिक सुट्या, सण-उत्सव म्हणजे या खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांचे सुगीचे दिवस असतात. रेल्वे डब्यात उभे राहून आणि चेंगरून प्रवास करून कुटुंबियांचे हाल करून घेण्यापेक्षा सामान्य प्रवासी या खासगी ट्रॅव्हल्ससाठी तिपटीने पैसे मोजतो. वर्षोनुवर्षे प्रवाशांची ही लूट अविरत सुरु आहे मात्र शासन त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करते. दरवर्षी अनेक सामाजिक संघटना या वाढीव तिकीटदराबाबत आवाज उठवतात, तक्रारी दाखल करतात, आंदोलने करतात मात्र राज्याचा परिवहन विभाग याकडे ढुंकूनही पाहत नाही. यांचे सीजन थोड्या थोडक्या दिवसांचे असते त्यामुळे ते संपले कि आंदोलन करणारे आपसूकच गप्प बसतील हे शासनालाही ठाऊक आहे त्यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून हे रहाटगाडे असेच सुरु आहे. या खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांवर सुट्टीच्या दिवसांत अधिक भार असल्याने अनेकदा गाड्यांच्या चालकांना पुरेशी झोप मिळत नाही ज्यामुळे अपघात घडतात, गाड्यांचे हेल्पर्स अनेकदा उर्मट असतात, गाड्यांचे एसी अनेकदा नीट काम करत नाहीत किंवा त्यातून पाणी गळत असते, अनेकदा प्रवाशांचे लगेज या गाड्यांच्या डिकीमधून चोरीला जाते या सर्वांच्या विरोधात त्यांच्या मालकांकडे तक्रार करूनही फारसा काही उपयोग होत नाही. चढ्या दरांत तिकीट खरेदी करून यांचा त्रासही सहन करावा लागतो. एरव्ही एसटीच्या दरात तिकीट देणाऱ्या या ट्रॅव्हल्स कंपन्या सुट्टीच्या दिवसांत अशा कोणत्या विशेष सुविधा देतात ज्याचे ते अधिक पैसे घेतात ? पोलिस प्रशासन या लुटीच्या संदर्भात काहीच कारवाई करण्यास तयार नसते, राज्य परिवहन विभागाला हे सर्व ठाऊक असूनही ते यामध्ये कोणताही हस्तक्षेप करण्यास तयार नसते. ब्रँडेड किंवा पॅकिंग केलेल्या प्रत्येक पदार्थावर किंवा वस्तूवर एमआरपीचा टॅग लावणे आज बंधनकारक आहे आणि त्या एमआरपीपेक्षा एक रुपयाही अधिक घेतल्यास त्याबाबतची तक्रार ग्राहक संरक्षण विभागाकडे करता येते. सदर विभागसुद्धा तक्रारीची तत्परतेने दखल घेतो, अशाचप्रकारे खासगी प्रवासाचे दर सरकार का निश्चित करत नाही ? का या सर्व लुटीत प्रशासनातील अधिकाऱ्यांचे आणि मंत्र्यांचे काही साटेलोटे असते असा प्रश्न आज प्रत्येकाला पडत आहे. सरकार या लुटीविरोधात काहीच करणार नसेल तर सर्वसामान्य जनतेने जायचे तरी कोणाकडे ?

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

◆ पान १ वरून पुढे...

## इंधनाचा दुष्काळ.....

तेल उत्पादक कंपन्यांच्या अपुऱ्या पुरवठ्यात असल्याचे समोर येत आहे. बाजारात इंधन दरवाढीची शक्यता असल्याने कंपन्यांकडूनच साठवणूक केली जात असल्याचा आरोप वाहनचालकांमधून होत आहे. याचे तांत्रिक विश्लेषण केले असता, सार्वजनिक तेल उत्पादक कंपन्यांकडूनच पेट्रोल पंप चालकांना होणारा इंधन पुरवठा जाणीवपूर्वक अपुरा ठेवला जात असल्याचे दिसून येते. एका पंपाची साठवणूक क्षमता २० ते २५ हजार लिटर असताना, भाववाढीचा लाभ घेण्यासाठी पाच-सहा दिवस विक्री थांबवणे पंप चालकांना व्यावहारिकदृष्ट्या परवडणारे नाही. कारण साठा उपलब्ध होताच हे पंप त्वरित सुरू होतात. त्यामुळे कंपन्याच आपल्या प्रकल्पांत अधिक साठा करून वितरकांना इंधन देत नसल्यावर शिक्कामोर्तब होत आहे. रात्र जागली इंधनासाठी! टंचाईची तीव्रता इतकी भीषण होती की, रविवारी मध्यरात्री जेव्हा बार्शी रोडवरील हिंदुस्थान पेट्रोलियमच्या पंपावर इंधनाचा टँकर आला, तेव्हा रात्रीच्या दोन-तीन वाजताही दुचाकीस्वारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. साठा संपेपर्यंत ही गर्दी कायम होती. सद्यस्थितीत रुग्णवाहिकांसारख्या आपत्कालीन सेवा, शेतीची कामे आणि अत्यावश्यक वाहतूक विस्कळीत झाली असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरत आहे. जिल्हाधिकारी व पंप चालकांची बैठक- टंचाई आणि पंपांवरील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी शहरातील सर्व पंप चालकांची तातडीची बैठक घेतली. यावेळी पंप चालकांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, आमच्यावर होत असलेला आरोप पूर्णपणे चुकीचा आहे. आम्ही कंपन्यांकडे वेळेवर आगाऊ रक्कम भरूनही इंधन वेळेवर पुरवले जात नाहीये. वितरकांकडे साठा नसल्यामुळेच आम्हाला पंप बंद ठेवावे लागत आहेत. पेट्रोल पंप डीलर्स असोसिएशनचे निवेदन- याच दरम्यान, बीड जिल्हा पेट्रोल पंप डीलर्स असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन आपल्या मागण्या मांडल्या. जागतिक बाजारपेठेतील बदलत्या परिस्थितीचे कारण देत कंपन्यांनी आगाऊ रक्कम अनिवार्य केली आहे. आम्ही त्याचे पालन करूनही आम्हाला इंधन वेळेवर मिळत नाही. याचा परिणाम दळणवळण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या रोजच्या जगण्यावर होत आहे, असे या निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेचे राजेश तांगडे, मोहम्मद मुदस्सीर, सचिन जगताप आणि मोहम्मद पठाण उपस्थित होते.

## "पेट्रोलसाठीची धावपळ....

परतत असताना टँकर आणि दुचाकीमध्ये हा भीषण अपघात झाला. इंधन तुटवड्याची लागली झळ- बीड जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. आंबा साखर कारखाना परिसरातील पंपावर पेट्रोल विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर विवेक तेथे गेला होता. पेट्रोल भरून गावी परतत असताना समोरून येणाऱ्या टँकरने त्याच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. उपचारादरम्यान प्राणज्योत मालवली- गंभीर जखमी झालेल्या विवेकला तात्काळ स्वराती रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र सोमवारी सकाळी उपचारादरम्यान त्याचे निधन झाले. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अपघातग्रस्त टँकर ताब्यात घेतला आहे. विवेक हा माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते सुधीर रानमारे यांचा मुलगा होता. सोमवारी सायंकाळी औरंगपूर येथील शेतात त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## घाटनांदूरमध्ये कुलरमध्ये....

कुलरमध्ये पाणी टाकत होता. यावेळी अचानक कुलरमध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने त्याला विजेचा जोरदार धक्का बसला आणि तो कोसळला. पत्नी आणि वडिलांनी तातडीने वीजपुरवठा बंद करून त्याला उपचारासाठी स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. दुर्दैवाने तिथे डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. नजीरच्या पश्चात पत्नी, अवघ्या आठ महिन्यांची मुलगी आणि वृद्ध आई-वडील असा परिवार आहे. घरातील एकमेव कमवता आधार गेल्याने या कुटुंबावर उपजीविकेचे मोठे संकट उभे राहिले आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून विद्युत उपकरणे वापरताना नागरिकांनी विशेषतः कुलरमध्ये पाणी भरताना वीजपुरवठा बंद ठेवण्याची काळजी घ्यावी असे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

## परळीतील डायमंड....

कळविण्यात आले. मात्र, नेहमीप्रमाणे यावेळीही अग्निशामक दल घटनास्थळी उशिरा पोहोचल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. घटनास्थळी दाखल झाल्यानंतर जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत अखेर आग आटोक्यात आणली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून तपास सुरू आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरातील एका रेझिन कापड दुकानालाही आग लागल्याची घटना घडली होती. त्या वेळीही अग्निशामक दल वेळेवर न पोहोचल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली होती. हा मुद्दा नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेतही उपस्थित करण्यात आला होता. तरीदेखील पुन्हा अशाच प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आलेल्या अग्निशामक गाडीत पुरेसे पाणी नसल्याचे समोर आले.

## बीड हादरलं!....

बचावले.मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर हे आपल्या पथकासह रात्रीच्या वेळी पेट्रोलिंग करत असताना त्यांच्या हॉटेल सुरू असल्याचे दिसले. पेट्रोलिंगदरम्यान संशयास्पद हालचाली दिसल्यानंतर पोलिसांनी संबंधितांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त झालेल्या टोळक्याने पोलिसांवरच दगडफेक सुरू केली. आम्हाला कोणी काही करू शकत नाही, अशी उघड दादागिरी करत आरोपींनी पोलिसांना लक्ष्य केल्याचे समोर आले आहे. राहुल हजारी या आरोपीने पोलिसांशी हुज्जत घालत धक्काबुक्की केली आणि गळा पकडला. धारूर पोलीस पथक आरोपींच्या शोधात असताना ही चकमक झाली. अतिरिक्त पोलीस कुमक मागवल्यानंतर संतापलेल्या आरोपींनी अंधाराचा फायदा घेत पोलिसांच्या दिशेने दगडफेक सुरू केली. यातील एक मोठा दगड थेट उपनिरीक्षक भवर यांच्या छातीला लागल्याने ते जखमी झाले आहेत. या हल्ल्यात एकूण अमित कांताप्रसाद तिवारी आणि सुजय गोकुळसिंग चव्हाण यांना अटक करण्यात आली आहे. तर राहुल हजारी, अमित सद्देवाल आणि मोहन रहिकवाल हे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. रार झालेल्या राहुल हजारी आणि इतर साथीदारांच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. भरवस्तीत आणि कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर अशा प्रकारे हल्ले होत असल्यामुळे पोलीस दलाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक उरला नसल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## ८ लग्न पचवले,....

असाच प्रकार बीडच्या उमापूर गावातून समोर आला असून नवरी एक अन् नवरदेव अनेक असे म्हणण्याची वेळ आली आहे. येथील उमापूर गावातील एका युवकाची बोगस लग्न लावणाऱ्या टोळीने लाखो रुपयांची फसवणूक केली. एकाच मुलीचे अगोदर आठ नवरदेवांसोबत लग्न लावण्यात आले. मात्र, पैशासाठी पुन्हा उमापूर येथील नवव्या नवरदेवासोबत एजंटकडून लग्न लावून देण्यात आले. दरम्यान, हे लग्न लावण्यासाठी, जुळवण्यासाठी नवऱ्या मुलाकडून लाखो रुपयांची रक्कम घेतली होती, लाखोंची फसवणूक केली आहे. याप्रकरणी बीडच्या चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून पीडित नवरदेव योगेश शिंदेने असून पोलीस अधीक्षकांकडे धाव घेत न्याय मागितला.

## इयत्ता सहावीच्या....

नवीन अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके तयार करण्याची जबाबदारी बालभारतीवर सोपवण्यात आली आहे. ही पुस्तके येत्या शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीपर्यंत उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. विद्यार्थ्यांना नवीन पद्धतीने शिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रमात बदल करण्यात आले असून त्यानुसार शिक्षण अधिक परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नवीन अभ्यासक्रम प्रभावीपणे राबवण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षणही महत्त्वाचे मानले जात आहे. एससीईआरटीतर्फे यासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. यानंतर जिल्हास्तरावर शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले जाईल, ज्यामुळे नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुलभ होईल. दुसरी, तिसरी, चौथी आणि आता सहावीचा नवीन अभ्यासक्रम लागू होत असल्याने राज्यातील शिक्षण पद्धतीत मोठा बदल होणार आहे. विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि कौशल्याधारित शिक्षण देण्याचा सरकारचा उद्देश आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीडमध्ये संत....

अनुराधा दीदी पंढरपूरकर यांनी केले. येथील स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा' सोहळ्याचा शुभारंभ मंगळवारी शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झाला. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात 'ओम नमो ज्ञानेश्वरा' या मंगलाचरणाने अत्यंत भक्तिमय वातावरणात झाली. प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड आणि वसंत थिगळे यांच्या हस्ते साध्वी अनुराधा दीदींचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. त्यानंतर दीदींनी आपल्या रसाळ वाणीतून माऊलींच्या पूर्वजांच्या जीवन चरित्राचा पट श्रोत्यांसमोर मांडला. साध्वी अनुराधा दीदी पुढे म्हणाल्या की,संतांनी चालवलेली भिंत असो वा, रेड्यामुखी वेद वदवणे, या चमत्कारांमागील व्यापक लोककल्याणाचा उद्देश आपण समजून घेतला पाहिजे. पंढरपूरची वारी ही माणसाला कमी साधनात आनंदाने कसे जगायचे, हे शिकवते. अध्यात्म आणि संतांचे विचार मनुष्याला संकटात प्रेरणा देतात. त्यामुळेच प्रत्येकाने संत चरित्र आत्मसात करणे काळाची गरज आहे असे त्या म्हणाल्या.

## बीडमध्ये वाहन....

पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर व पथकाने लातूर येथे सापळा रचून तैबाज सलीम शेख (वय २५) आणि रेहान इलाही शेख (वय १९) या दोन आरोपींना ताब्यात घेतले. पोलीस चौकशीत आरोपींकडून चोरीस गेलेला टेम्पो जप्त करण्यात आला असून त्यांनी विवेकानंद पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर नं. २०७/२०२६ अंतर्गत पिकअप चोरी केल्याची कबुली दिली आहे. दोन्ही आरोपींना मुद्देमालासह पेठ बीड पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत श्रीराम खटावकर, मारुती कांबळे, बाळु सानप, सोमनाथ गायकवाड, युनुस बागवान, अश्पाक सय्यद, मनोज परजणे, आश्विन सुरवसे व चालक अतुल हराळे यांनी सहभाग घेतला.

## अंबाजोगाई तालुका....

सोसायटी मतदार संघातून १० प्रतिनिधींची निवड करण्यात आली आहे. वैयक्तिक मतदार संघातून खुल्या प्रवर्गातून ॲड. जयसिंग आनंदराव चव्हाण आणि प्रदीप सदाशिवराव चव्हाण यांची निवड झाली. महिला प्रतिनिधी म्हणून दिपाबाई दिलीपराव देशमुख आणि छायाबाई गुलाबराव गंगणे यांनी बाजी मारली आहे. इतर मागास प्रवर्गातून नागोराव पांडुरंग माले, अनुसूचित जाती प्रवर्गातून बंडू भीमराव जोगदंड आणि भटक्या जमाती प्रवर्गातून दिलीप नाथराव गित्ते यांची बिनविरोध निवड झाली आहे. सोसायटी मतदार संघातून वसंतराव बप्पाजी कदम, पांडुरंग बाबुराव अजान, सुधीर ज्ञानोबा चाटे, सचिन दामोदर शिंदे, मधुकर बालासाहेब काचगुंडे, हरिभाऊ भागवत निकम, आदिनाथ शंकरअप्पा शेटे, प्रतापराव तुकाराम आपेट, बालाप्रसाद रामगोपाल बजाज आणि अंकुश पुरुषोत्तम गायकवाड यांची संचालक म्हणून वर्णी लागली आहे. १९७० साली स्थापन झालेली ही संस्था तालुक्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावते. स्थापनेपासून ही संस्था सहकारमहर्षी स्व. ॲड. आनंदराव चव्हाण यांच्या ताब्यात होती. २०१२ पासून संस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. जयसिंग आनंदराव चव्हाण हे असून संस्थेच्या वाटचालीत त्यांची भूमिका महत्वाची राहिली आहे. यावर्षी सर्वसंमतीने झालेल्या या निवडीमुळे संस्थेच्या पुढील वाटचालीस मोठे बळ मिळाले असून नेत्यांच्या एकीचे दर्शन या निमित्ताने घडले आहे.

## मुलीला पळवून....

(राहणार गांगठनिमगाव, तालुका कर्जत) हे बेकायदेशीररीत्या तिथे आले. आरोपींच्या नातेवाईक मुलीला पळवून नेल्याच्या एक वर्षापूर्वीच्या रागातून हा हल्ला करण्यात आला. आरोपींनी लाकडी दांडके आणि कुऱ्हाडीच्या तुंब्याने दिलीप शेळके आणि नवनाथ घोडके यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत दिलीप शेळके यांच्या डोळ्याला गंभीर इजा झाल्याने त्यांचे दृष्टीपटल निकामी झाले असून पायही फॅक्चर झाला आहे. तसेच अशोक महाजन याने दिलीप शेळके यांच्या खिशातील १०,४०० रुपये रोख आणि मोबाईल जबरदस्तीने चोरून नेला. घटनेनंतर जखमींना तातडीने अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ ११८ (१). ११९ (१) ३५१ (२) आणि इतर कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ भडके करत आहेत.

## प्रशासकीय बदल्यांचा....

कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री, पालकमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि विभागीय आयुक्त यांना निवेदन देत आंदोलनाचा इशाराही दिला आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागांमध्ये विभागप्रमुखांकडून मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विभागीय आयुक्तांची परवानगी न घेता प्रतिनियुक्तीऐवजी अतिरिक्त कामकाज या नावाखाली आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच ठिकाणी ठेवण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. सध्या १०० हून अधिक कर्मचारी अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रजासत्ताक दिनानंतरही आदेश केवळ कागदावरच- प्रजासत्ताक दिनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर २२ जानेवारी रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) प्रदीप काकडे यांनी सर्व विभागप्रमुखांना अतिरिक्त पदभार कमी करून कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू करण्याचे आदेश दिले होते. मात्र हे आदेश प्रत्यक्षात राबविण्यात आले नसल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. यामुळे पुन्हा एकदा जिल्हा प्रशासनाला आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून, प्रशासकीय बदल्यांचा दिखावा थांबवून पारदर्शक कारभार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीचा.....

थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक १९/०३/२०२३ रोजी सकाळी ०७. ०० वाजता मुलगी ही गल्लीतील शेख युनुस याचे चहा पाण्याचे हॉटेल वर असता ती आर्ध्या तासाने घरी परत आली तीला मी उशिर का झाला असे विचारले असता ती रडू लागली म्हणून तीला विचारले असता तिने सांगितले की, मी दुध आणन्यासाठी युनुस चाचा यांचे चहाचे हॉटेल समोर उभी असतांना मी दुध घेतले तेव्हा मला युनुस चाचाने हॉटेलमध्ये बोलावले मी हॉटेलजवळ गेले असता युनुसचाचाने मला हॉटेलमध्ये बोलावले मी आतमध्ये जाण्यास नकार दिला असता त्यांनी माझा हाताना धरून हॉटेलमध्ये ओढले व माझे गळयास मिठी मारली मी त्यास मला सोड असे म्हणाले असता त्याने मला हॉटेलच्या आतील बाजूस ओढण्याचा प्रयत्न करू लागला व त्याने त्याचे पॅन्टची चैन खोलली तेव्हा मी मोठयाने ओरडू लागले तेव्हा सयद शहानवाज इकबाल हे तेथे आले व त्यांनी युनुस यास तु क्या कर रहा है तेरे बच्चीकी उमरकी है असे म्हणून त्यास शिवीगाळ करून दोन चापटा मारल्या व मला तु घरी जा असे म्हणाले. तेव्हा मी घरी आले. पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पेठ बीड येथे आरोपी विरूध्द कलम ३५४-अ भादवी आणि कलम ८, १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील सपोनि जी.एल. अंतरप यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणी सुनावणी मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब मा. सुरेश एस. घोरपडे साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०६ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणातील फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फितूर झाले असतांना सदर प्रकरणात केवळ पिडीता, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी, व इतर साक्षीदार यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब मा. सुरेश एस. घोरपडे साहेब यांनी आरोपी यास कलम ३५४-अ भादवी आणि कलम ८, १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ अन्वये यांनी दोषी ठरवून ५ वर्ष सश्रम करावास व १०,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले. तपास अधिकारी सपोनि जी.एल. अंतरप व पैरवी अधिकारी श्री. ऋषीकेश सानप व कोर्ट ड्यूटी बाळासाहेब सानप यांनी सहकार्य केले.

## संगोपनाअभावीच.....

मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरू असतानाही वन विभाग कुंभकर्णी झोपेत आहे. दरवर्षी वन विभागामार्फत केले जाणारे वृक्षारोपण हे केवळ आकडेवारी आणि फोटोपुरतेच मर्यादित राहिल्याने बीड जिल्ह्याचे वाळवंटीकरण वेगाने होत आहे. वृक्ष लागवड करणे हे केवळ सरकारी टार्गेट नसून, लावलेली झाडे जगवणे ही नैतिक जबाबदारी होती, मात्र प्रशासनाने केवळ प्लांटेशनवर भर दिला आणि संगोपनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. परिणामी, मोकळ्या माळरानावर लावलेली लाखो रोपे उन्हाळ्याआधीच वाळून राख झाली आहेत. यामुळे शासनाचा कोट्यवधींचा निधी थेट मातीत गेला आहे. इंधन, बांधकाम आणि शेती विस्ताराच्या नावाखाली जिल्ह्यातील जुनी व डेरेदार झाडे रात्रीच्या वेळी तोडली जात आहेत. रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली महामार्गाच्या कडेला असलेल्या शेकडो वर्षांच्या वारशावर कुऱ्हाड चालवण्यात आली.

## समर कॅम्प प्रत्येक.....

आयोजित केलेला पार्थ समर कॅम्प हा स्तुत्य उपक्रम असून समर कॅम्प ही लहान मुलांसाठी संस्कार शिबिरेच असतात. यावेळी मैत्रेयी ग्रुपच्या अध्यक्षा कविताताई आव्हाड, आरोग्यदीप हॉस्पिटलचे संचालक अभिजित पवार, पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव दिलीपराव गर्जे, कुणाल आव्हाड, अशोकराव चोरमले, प्राचार्य डॉ बबन चौरे, प्रतीक्षा आव्हाड, डॉ विजय देशमुख उपस्थित होते. डॉ संदीप पवार पुढे म्हणाले, पार्थ समर कॅम्प हा फक्त विविध खेळांपुरता मर्यादित न राहता या समर कॅम्पमध्ये मुलांची सर्जनशीलता वाढविण्यासाठी वेगवेगळे कौशल्याधारित उपक्रम राबविण्यात आले. प्रत्येक मुलामध्ये एक खास कलागुण असतो तो ओळखण्याची संधी समर कॅम्प उपलब्ध करून देते. मुलांनी मोबाईलच्या आहारी न जाता अशा समर कॅम्पमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. पालकांनीही मुलांना मोबाईलपासून दूर ठेऊन सुट्ट्यांचा सदुपयोग त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी करावा.अशोकराव चोरमले यांनी यावेळी मुलांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पूर्वी भारतीय संस्कृतीत गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. गुरुकुल पद्धतीमध्ये मुले निवासी असायची त्यांना शिक्षणाबरोबरच इतर सर्व कलागुणांमध्ये निपुण केले जायचे. कालांतराने भारतामध्ये 'सर्व्हिस ओरीएनटेड' शिक्षणपद्धती आल्याने गुरुकुल ही संकल्पना बंद पडली. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे धावपळीच्या युगात विद्यार्थ्यांना पालकांचा हवा तेवढा सहवास मिळत नाही. त्यामुळे घरात आनंदी वातावरण कमी आढळते. मुले पूर्णपणे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. मोबाईलपासून दूर ठेऊन मुलांच्या कलागुणांना वाव देणारा पार्थ समर कॅम्प पुढील वर्षी अजून भव्य स्वरुपात आयोजित केला जावा अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. एक आठवडा चाललेल्या पार्थ समर कॅम्प मध्ये पाथर्डी शहरातील एकूण १२२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पार्थ समर कॅम्पसाठी कला शिक्षक दिपक राठोड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, क्रीडाशिक्षक साईनाथ ढाकणे, सचिन माळवदे, भारत राठोड, ऋषी चौरे, गीता कोलते, पायल असलकर, प्रमोद हंडाळ, मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, पर्यवेक्षक संपत घारे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, सतीश डोळे, संदीप धायतडक, विठ्ठल धस यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल आव्हाड, सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके तर आभार संपत घारे यांनी मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीजभांडवल, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

## दि.11 पासून अर्ज स्विकारणार

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

सुधारीत बीजभांडवल योजना आणि जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजन अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी दि.११ मे पासून अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. अर्ज स्विकारण्यासाठी दि.३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदत असून सुशिक्षीत बेरोजगारांनी अर्ज करावे,असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक करुणा खरात यांनी केले आहे.

सुधारीत बीज भांडवल योजना

सेवा, उत्पादन आणि व्यापार व्यवसायासाठी सुधारीत बीज भांडवल योजनेअंतर्गत कर्ज घेता येते.

अर्हता- किमान ७ वी उत्तीर्ण, वयोमर्यादा - १८ ते ५० वर्ष, लाभार्थी १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

प्रकल्प मर्यादा- २५ लाख रुपये, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत बीज भांडवल रक्कम १५ ते २० टक्के व ३ लाख ७५ हजार मर्यादेत ६ टक्के व्याय दराने कर्ज देण्यात येते. त्यात बँकेच्या कर्ज रकमेचा ७५ टक्के व अर्जदाराचा सहभाग ५ ते १० टक्के असतो.

जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनाः-सेवा उद्योग, उत्पादन उद्योगासाठी कर्ज घेता येते.

अर्हता-शिक्षणाची व वयाची अट नाही, गावाची लोकसंख्या एक लाखाच्या आत असावी.

योजनेअंतर्गत उपलब्ध कर्ज-एकूण प्रकल्प किंमत २ लाखापर्यंत, सर्वसाधारण प्रवर्गासाठी २० टक्के जास्तीत जास्त ४० हजार रुपये , अनुसूचित जाती / जमातीकरीता ३० टक्के व जास्तीत जास्त ६० हजार रुपये /मर्जिन मनी म्हणून ४ टक्के व्याज दराने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कर्ज रुपाने देण्यात येते.

या योजनांचा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा. त्यासाठी दि.११ मे पासून अर्ज स्विकारणे सुरु होणार आहे,असे महाव्यवस्थापक करुणा खरात यांनी कळविले आहे.

# भगवंत प्राप्तीसाठी कलियुगात नामस्मरणच सर्वश्रेष्ठ साधन

### वेदविभूषण उद्बोध महाराज यांचे प्रतिपादन ; बीडमध्ये 'श्री नवनाथ कथासार' संगीतमय कथेचा उत्साहात प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

परमेश्वर प्राप्तीचे मार्ग काळानुसार बदलत गेले असले, तरी साध्य मात्र तेच राहिले आहे. पूर्वीच्या काळी यज्ञ आणि अनुष्ठानांवर भर दिला जात असे, मात्र कलियुगात भगवंताचे नामस्मरण हेच भक्तीचे सर्वात मोठे आणि प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन वेदविभूषण उद्बोध महाराज (श्री संत नरहरीनाथ महाराज संस्थान, श्रीक्षेत्र देऊळगावराजा) यांनी येथे केले. शहरातील स्व. झुंबरलाल खटोड



सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'श्री नवनाथ कथासार' या संगीतमय कथेच्या शुभारंभ प्रसंगी ते मंगळवारी बोलत होते. प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड यांच्या हस्ते महाराजांचे पुष्पहार अर्पण करून जंगी स्वागत करण्यात आले. कथेचे महत्त्व विशद करताना महाराज म्हणाले की,मनुष्य जन्मात काय करावे आणि काय करू नये, याची नियमावली म्हणजे संहिता होय. नवनाथ कथा ही प्रत्येकाने आपल्या अंतःकरणात साठवून ठेवावी. देवाला स्वतःच्या नामापेक्षा भक्ताचे नामसंकीर्तन केलेले अधिक आवडते. जर आपल्याला देवाला आवडायचे असेल, तर संतांच्या कथा श्रवण करणे आवश्यक आहे. कथा अशी ऐकावी की ज्यामुळे चित्त स्थिर होईल आणि धर्मशास्त्राच्या नियमांचे पालन घडेल. यावेळी त्यांनी श्रीमद् भागवत आणि रामायणातील विविध दाखले देत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आजच्या धगधगत्या आणि धावपळीच्या जीवनात मनाला शांती आणि समाधान मिळवण्यासाठी अध्यात्म महत्त्वाचे आहे. ७६०० ओव्यांचा हा नवनाथ कथासार ग्रंथ असून, प्रत्येकाने यातील विचार आत्मसात करावेत, असे आवाहनही उद्बोध महाराज यांनी यावेळी केले.या सोहळ्याला बीड शहरातील भाविक उपस्थित होते.

# निर्वाचित पक्ष, गट व अपक्षांसाठी महत्त्वाची सूचना: 11 मेपूर्वी आघाडी नोंदणी आवश्यक

**परभणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यासाठी सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम १०-१ अ(४) आणि कलम ५९ अ (४) मधील तरतुदींनुसार, जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करताना मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेणे आवश्यक आहे.

या तौलनिक संख्याबळाचा निर्णय घेण्याच्या प्रयोजनासाठी, मान्यताप्राप्त पक्ष, नोंदणीकृत पक्ष, गट किंवा अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसलेल्या निर्वाचित सदस्यांस निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत 'आघाडी' तयार करता येईल. या आघाडीची नोंदणी झाल्यावर तिला निवडणूकपूर्व आघाडी असल्याप्रमाणे कायदेशीर मान्यता लागू होईल.

जिल्ह्यातील जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२६ रोजी लागले व निर्वाचित सदस्यांची नावे दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली. अधिनियमातील नवीन तरतुदीनुसार, निर्वाचित राजकीय पक्षांना, गटांना व अपक्ष सदस्यांना आघाडी तयार करण्यासाठी निवडणूक निकालाच्या तारखेपासून ३ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय आहे. त्यानुसार, जिल्ह्यातील संबंधित निर्वाचित सदस्यांना व पक्षांना आघाडी तयार करून तिची नोंदणी करण्यासाठी दिनांक ११ मे २०२६ पर्यंत मुदत देण्यात येत आहे.

तरी, नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्ती प्रक्रियेकरिता ज्या राजकीय पक्षांना, गटांना किंवा अपक्ष सदस्यांना आघाडीची नोंदणी करावयाची आहे, त्यांनी दिनांक ११ मे २०२६ पर्यंत आवश्यक त्या कायदेशीर दस्तऐवजांसह आपला रीतसर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय येथे सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

# सुशिक्षित बेरोजगारांसाठी सोनपेठ येथे ८ मे रोजी रोजगार मेळावा

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व केंद्रीय कन्या प्रशाला, सोनपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मे, २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता सोनपेठ येथील केंद्रीय कन्या प्रशाला येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा भव्य महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास विविध नामांकित राज्यातील मोठे उद्योजक/कंपन्या व जिल्ह्यातील खाजगी आस्थापना सहभाग नोंदविणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी, ट्रेनी ऑपरेटर, लाईफ मित्र, फिल्ड सिस्टंट ट्रेनी, इत्यादी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी वेतन १० ते २५ हजार असून, अनुभवावरून वेतनामध्ये वाढ होऊ शकते. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत खाजगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षणार्थीची निवड देखील करण्यात येणार असून त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार प्रतिमाह ६ ते १० हजार इतके विद्यावेतन ११ महिन्यांकरिता देण्यात येणार आहे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या (रहरीुूरा.सीं.ळप) या संकेतस्थळावर करावी. नाव नोंदणीची सुविधा महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी देखील करण्यात आलेली आहे. महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नाव नोंदणी करण्यासाठी दि. ८ मे रोजी सकाळी ८.३० वाजता केंद्रीय कन्या प्रशाला, सोनपेठ येथे स्वखर्चाने सर्व उमेदवारांनी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या दूरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी केले आहे.

# मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करा;

## आपत्ती टाळण्यासाठी सज्ज राहा: जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात संभाव्य पावसाळी आपत्ती टाळण्यासाठी सर्व विभागांनी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावीत आणि आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलिस अधिक्षक सूरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी



किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, यावर्षी पावसाचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी उष्णतेमुळे अचानक मुसळधार पावसाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी प्रशासनाने सज्ज राहणे गरजेचे आहे. विष्णुपूरी धरणात सध्या पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा असून त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच धरणाचे गेट, नवीन पाईपलाईन कामे यांची स्थिती तपासण्याचे निर्देश देण्यात आले. मागील वर्षी मुखेड, नायगाव, बिलोली, कंधार यासह विविध तालुक्यांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला होता. यंदा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. शहरातील नाल्यांची स्वच्छता करून सखल भागात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच पूल आणि रस्त्यांवरून पाणी वाहून जाऊन नागरिक अडकणार नाहीत यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागाला ग्रामीण भागात औषधसाठा मुबलक ठेवण्याचे, तसेच सर्पदंशावरील औषधे सर्व आरोग्य केंद्रात उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाने नदीपात्रात पशुधन बांधू नये यासाठी जनजागृती करावी, असेही सांगण्यात आले.

बैठकीच्या शेवटी, सर्व विभागांनी तालुका पातळीवरील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून आपत्ती व्यवस्थापनाचे आराखडे तात्काळ जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले.

## लोकशाही दिनी ३१ तक्रारी अर्ज प्राप्त



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजीत केला जातो. सोमवार दि.४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिन आयोजीत करण्यात आला. यावेळी तब्बल ३१ तक्रारी अर्ज प्राप्त झाले. त्याचा विभागनिहाय तपशिल याप्रमाणे- जिल्हा परिषद - २, महसूल विभाग- १०, कृषी विभाग- १ व इतर साधे निवेदन १८ असे एकून ३१ अर्ज प्राप्त झाले, असे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.

# नवीन कामगार नियमावलींच्या मसुद्यावर हरकती व सूचना नोंदविण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील कामगार क्षेत्रात मोठे बदल घडवून आणणाऱ्या केंद्र सरकारच्या विविध कामगार संहितांच्या अनुषंगाने, राज्य शासनाने नवीन नियमांचे प्रारूप जाहीर केले आहे. महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता तसेच सामाजिक सुरक्षा संहितेशी संबंधित हे नियम राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आले असून, यावर संबंधित घटक आणि नागरिकांकडून पुढील ४५ दिवसांचे आत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आलेले 'महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता नियम, २०२०' तसेच 'महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती (कामगार) नियम, २०२५' आणि 'महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती (कारखाने व इतर बंदरे) नियम, २०२५' यांचे मसुदे नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. यासोबतच, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या अंतर्गत 'महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा संहिता नियम, २०२६' चे प्रारूपही अधिसूचनेद्वारे जनसामान्यांसाठी खुले करण्यात आले आहे. या अधिसूचना ३० एप्रिल २०२६ आणि ५ मे २०२६ रोजीच्या राजपत्रात अधिकृतपणे प्रसिद्ध झाल्या आहेत. हे प्रस्तावित नियम कामगारांचे हित, कामाच्या ठिकाणची सुरक्षितता आणि उद्योगांमधील पारदर्शकता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण मानले जात आहेत. या नियमांच्या सविस्तर अभ्यासासाठी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ https://maharashtra.gov.in आणि कामगार विभागाचे संकेतस्थळ https://mahakamgar.maharashtra.gov.in यावर 'कायदा व नियम' या शीर्षकाखाली संपूर्ण मसुदा उपलब्ध करून देण्यात आला आहे.


# अजिंठा परिसराचा सर्वांगीण पर्यटन विकास साधणार : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई । प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे असलेल्या अजिंठा परिसराचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास करण्याचे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मुंबई येथील शासकीय निवासस्थान मेघदूत येथे अजिंठा परिसरातील पर्यटन विकासासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस सिल्लोड-सोयगाव मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार उपस्थित होते. तसेच पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे कार्यकारी अभियंता आकाश चकोर, छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. एस. भगत तसेच संबंधित विभागांचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान अजिंठा लेणी परिसरातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या





सुमारे ७०० एकर क्षेत्राच्या नियोजनबद्ध विकासासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. या क्षेत्रात पर्यटकांसाठी आधुनिक व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबत तसेच प्रकल्पांच्या टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीसंदर्भात चर्चा करण्यात आली. यासाठी स्थळ पाहणी करून लोकप्रतिनिधी, स्थानिक प्रशासन व पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली सल्लागार समिती स्थापन करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच अजिंठा व घटोत्कच लेणी परिसरातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसह स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने व्यापार संकुल विकसित करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. पर्यटकांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षा व्यवस्था व इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही मंत्री देसाई यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. दरम्यान शिव स्मारक व भीम पार्क या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

# जालना जिल्ह्यात 'विपश्यना केंद्रा' सह बहुउद्देशीय सुविधा उभारणीला गती द्यावी – सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**मुंबई । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना' अंतर्गत विपश्यना केंद्रासह वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र आणि प्रशिक्षण केंद्र अशा बहुउद्देशीय सुविधांच्या उभारणीला गती देण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिल्या आहेत.



मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात जालना महानगरपालिका हद्दीमध्ये विपश्यना केंद्र उभारणी संदर्भात बैठक झाली. या बैठकीस आमदार अर्जुन खोतकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, दूरदृश्य प्रणाली द्वारे जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा, जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, या प्रकल्पामुळे जालना जिल्ह्यातील सामाजिक व शैक्षणिक विकासाला मोठी चालना मिळेल. 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना' अंतर्गत प्रस्तावित या प्रकल्पाचा उद्देश समाजाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक उन्नतीला चालना देणे हा आहे. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक अभ्यासिकांचे वातावरण, नागरिकांना सांस्कृतिक उपक्रमांसाठी व्यासपीठ आणि समाजाला आध्यात्मिक विकासासाठी विपश्यना व धम्म केंद्रांचा लाभ मिळणार आहे.

प्रस्तावित कामांची प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करावा. जमिनीची मोजणी, पाण्याची पातळी तपासणी आणि तांत्रिक अहवाल ही कामे प्राधान्याने पूर्ण करावी. प्रकल्पासाठी आवश्यक जमीन महानगरपालिकेच्या नावावर हस्तांतरित करण्याची प्रक्रिया तात्काळ करावी. आयुक्त, जिल्हाधिकारी, महापौर आणि लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे स्थानिक पातळीवर बैठका घेऊन या प्रकल्पाबाबतचा सातत्याने आढावा घेण्याचे निर्देशही सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी यावेळी सांगितले.

दैनिक
# मराठवाडा पत्र
▸▸ बुधवार, दि. ०६ मे २०२६ ▸▸ Page 4

## बीडमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथेला प्रारंभ




**बीड । प्रतिनिधी–**

संत ज्ञानेश्वर महाराजांनी मानवी जीवनाच्या उद्धारासाठी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जो मार्ग दाखवला, तो केवळ आध्यात्मिक नसून संपूर्ण विश्वाच्या कल्याणाचा महामार्ग आहे. माऊलींचे जीवन चरित्र हे मनुष्याच्या मनातील भ्रांती आणि अज्ञान दूर करून जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरे देणारे आहे, असे प्रतिपादन साध्वी ▶▶ उर्वरित पान २ वर

# नसरापूर घटनेतील आरोपीस फाशीची शिक्षा द्या

**बीड । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात असणाऱ्या नसरापूर या गावांमध्ये केवळ चार वर्षाच्या अत्यंत निरागस बालिकेवर च्या विकृत व्यक्तीने केलेल्या अत्याचाराचा व्यापक स्तरावर निषेध व्यक्त करण्यासाठी मंगळवारी जिल्हाधिकारी महोदयांना परशुराम हिंदू सेवा संघ बीड व बीड शहरातील समाजशील विचारांच्या व्यक्तीने निवेदन देण्यात आले.



समाजात बाल अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे .पोलिसाचा आरोपीवर धाक राहिलेला नाही,त्यामुळे मनुष्याच्या जन्माला येऊनही जनावरांसम वर्तन करून घृणास्पद बाल अत्याचाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येत आहे .अशा नराधमांना आद्दल घडवण्यासाठी शासनाने आरोपीस कठोर शिक्षा दयावी जेणेकरून पुन्हा अशा प्रकारच्या गैरकृत्यांना करण्याची हिंमतच कोणाची होऊ नये . झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी संवेदनशील मनाच्या व्यक्ती कडून शासनाला जाग आणि जाण आणण्याच्या उद्देशाने हे निवेदन देण्यात आले. आज वेशीवर असणारे संकट उद्या आपल्या घरापर्यंत येऊन आपल्या कुटुंबाला अकल्पित परिस्थितीला तोंड द्यायला कशावरून लावणार नाही असा हादरवून टाकणारा विचार मुलींच्या पालकांची झोप उडवणारा ठरतो आहे. आगामी काळामध्ये पुन्हा अशा घटना घडू नयेत यासाठी सामाजिक स्तरावर सर्व समाज संघटना रस्त्यावर उतरून आपले सामाजिक उत्तरदायित्व पूर्णत्वाला नेणार आहेत. या निदर्शनासाठी जबाबदार नागरिकत्वाच्या भूमिकेतून बीडकरांनी हजारोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र येऊन मंगळवारी सकाळी ११ वाजता मा.जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देण्यात आले

## बीडमध्ये वाहन चोरी प्रकरण उघड

### दोन आरोपी अटक, चोरीचा टेम्पो जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चारचाकी वाहन चोरी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने यशस्वी छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो जप्त करण्यात आला आहे.




पेठ बीड येथील मोमीनपुरा परिसरातील रहिवासी अश्पाक अनिमोद्दीन जुलहा यांचा टेम्पो दि. १० एप्रिल २०२६ रोजी बार्शी रोड परिसरातून अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला होता. याबाबत पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी लातूर येथील असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार ▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाई तालुका खरेदी विक्री संस्थेच्या सर्व १७ जागांची निवडणूक बिनविरोध

### ना. पंकजाताई मुंडे, आ. धनंजय मुंडे, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, ज्येष्ठ नेते अशोकराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झाला निर्णय

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुका खरेदी विक्री संस्थेच्या पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणुकीत राजकारणातील दिग्गज नेत्यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली सर्व १७ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय



मुंडे, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा आणि ज्येष्ठ नेते अशोकराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक बिनविरोध पार पडली. तालुक्यातील सहकार क्षेत्रात सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत ही निवडणूक बिनविरोध घडवून आणल्याने राजकीय वर्तुळात या निर्णयाचे स्वागत होत आहे. या निवडणुकीत एकूण १७ जागांसाठी प्रक्रिया राबवण्यात आली होती. यामध्ये वैयक्तिक मतदार संघातून ७ तर ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुलीला पळवून नेल्याच्या रागातून दोन शेतकऱ्यांवर जीवघेणा हल्ला एकाचा डोळा कायमचा निकामी

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतात नांगरणी करत असलेल्या दोन शेतकऱ्यांवर जुन्या वादाचा राग धरून लाकडी दांड्याने आणि कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना हिवरा शिवारात घडली आहे. या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा उजवा डोळा कायमचा निकामी झाला असून दुसऱ्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैभव दिलीप शेळके (वय ३०, राहणार धानोरा



तालुका आष्टी) यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. फिर्यादीचे वडील दिलीप शेळके आणि मामा नवनाथ तुकाराम घोडके हे ३ मे रोजी संध्याकाळी हिवरा येथील शेतात ट्रॅक्टरने नांगरणी करत होते. त्यावेळी आरोपी संतोष भाऊसाहेब लवांडे, रोहित संतोष लवांडे (दोन्ही राहणार हिवरा, तालुका आष्टी) आणि अशोक रामदास महाजन ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रशासकीय बदल्यांचा 'फार्स' सीईओ जितिन रेहमान यांनी थांबवा

### अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली जुन्याच ठिकाणी प्रतिनियुक्ती : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या क व ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या ७ व ८ मे रोजी समुपदेशनाद्वारे होणार असल्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांनी जारी केले आहेत. मात्र, मागील काही वर्षांच्या अनुभवावरून या बदल्या केवळ औपचारिकता ठरत असल्याचा



आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे. डॉ. ढवळे यांच्या म्हणण्यानुसार, बदल्या झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना इतर विभागात किंवा तालुक्यात पाठविण्याऐवजी अतिरिक्त कामकाज या नावाखाली पुन्हा त्याच विभागातच कार्यरत ठेवले जाते. त्यामुळे प्रत्यक्षात बदल्यांचा उद्देशच फोल ठरत असून प्रशासनाचा हा प्रकार फार्स असल्याची तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिले होते. मात्र अद्याप ▶▶ उर्वरित पान २ वर

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस पाच वर्ष कारावासाची शिक्षा

### मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायधीश–१ सुरेश. एस. घोरपडे साहेब यांचा महत्वपूर्ण निकाल

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक. १९/०३/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजता आरोपी याने



अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी इस्लामपुरा बीड येथील रहिवाशी असलेला आरोपी नामे. शेख युनुस शेख लाल यास मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब मा. सुरेश एस. घोरपडे साहेब यांनी दोषी ठरवून ५ वर्ष सश्रम करावास व १०,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले या प्रकरणी ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रशासकीय अनास्था! धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाची दुरवस्था

### शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट, महादेव गंगणे पाटील यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा





**बीड । प्रतिनिधी**

शहराच्या वैभवात भर घालणार्या आणि करोडोंचे प्रेरणास्थान असलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाची सध्या मोठी दुरवस्था झाली आहे. प्रशासनाच्या या उदासिनतेमुळे स्थानिक नागरिकांसह शिवप्रेमींमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली असून, स्मारकाची तातडीने डागडुजी आणि स्वच्छता करण्याची मागणी केली जात आहे.

अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्य महादेव गंगणे पाटील यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा आणि परिसर सध्या देखभालीअभावी अतिशय दयनीय अवस्थेत आहे. स्मारकाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात सर्वत्र कचरा आणि घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पुतळ्याच्या चौथर्याची पडझड झाली असून, रात्रीच्या वेळी या ठिकाणी पुरेशी दिवाबत्ती नसल्याने परिसरात अंधार असतो. एकीकडे महापुरुषांच्या नावाने राजकारण केले जात असताना, दुसरीकडे त्यांच्या स्मारकांकडे होणारे हे दुर्लक्ष प्रशासनाचे अपयश असल्याची टीका होत आहे. पुतळा जेव्हा बसवला गेला तेव्हा सत्ताधारी आणि मा. नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या सह त्यांच्या सहकार्यांनी एक महिन्यात सुशोभीकरण करू अशा घोषणा करत प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न केला होता पण प्रत्यक्षात परिस्थिती पूर्ण उलटी असल्याची प्रतिक्रिया महादेव गंगणे पाटील यांनी दिली आहे स्थानिक शिवप्रेमींनी अनेकवेळा नगर पालिकेकडे या संदर्भात तक्रारी केल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. स्वराज्यरक्षकांचे स्मारक ही आमची अस्मिता आहे, त्याची अशी अवस्था पाहणे क्लेशदायक आहे, अशा भावना शिवप्रेमींसह महादेव गंगणे पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत. या स्मारकाची नियमित स्वच्छता व्हावी,

## संगोपनाअभावीच जातोय झाडांचा बळी; फोटोसेशन करून करोडोंचा फार्स, वन विभागाला जाग येणार तरी कधी?



**बीड । प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या सुरवातीला हातात रोपटं घेऊन हसऱ्या चेहऱ्याने फोटो काढणारे शासकीय अधिकारी आणि नेत्यांचा लवाजमा आपण दरवर्षी पाहतो. झाडे लावा, झाडे जगवा अशा घोषणांनी आसमंत दुमदुमतो, पण उन्हाळ्याच्या पहिल्या झळा लागताच हेच हसरे चेहरे आणि ती लाडकी रोपटं कुठे गायब होतात? बीड जिल्ह्याची जी लाहीलाही होत आहे, तापमान ४३ अंशांच्या पुढे जाऊन जो चटका बसत आहे, तो केवळ निसर्गाचा कोप नाही.

तो आहे वन विभागाचा निर्लज्जपणा, प्रशासकीय उदासीनता आणि मानवी लोभाने निसर्गाच्या छाताडावर मारलेली कुऱ्हाड! जिल्ह्याची वाटचाल हिरवाईकडून वाळवंटाकडे सुरू असताना वन विभाग मात्र एसी केबिनमध्ये बसून लाखो वृक्ष लागवडीची खोटी आकडेवारी फुगवण्यात मग्न आहे. जिल्ह्यात सध्या प्रचंड उष्णता जाणवत असून, शहरांचे सिमेंटच्या जंगलात रूपांतर झाले आहे. ग्रामीण भागात ▶▶ उर्वरित पान २ वर

## समर कॅम्प प्रत्येक छोट्या शहरांमध्ये आयोजित होणे गरजेचे : डॉ संदीप पवार

### पाथर्डी शहरातील पार्थ समर कॅम्पचा यशस्वी समारोप

**अहिल्यानगर(पाथर्डी) । प्रतिनिधी**

पूर्वी समर कॅम्प मोठ्या शहरांमध्ये आयोजित केले जात. उन्हाळ्याची सुट्टी लागली की समर कॅम्प सुरु होत. खेड्यापाड्यातील, गावातील



तसेच छोट्या शहरातील लहान मुलांना आर्थिक अडचणींमुळे व कौटुंबिक कारणांमुळे या शहरांमध्ये जाऊन समर कॅम्पमध्ये सहभागी होणे शक्य होत नसे. मागील वर्षीपासून येथील अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठानने पाथर्डीसारख्या छोट्या शहरामध्ये पार्थ समर कॅम्पच्या माध्यमातून शहरातील बालगोपालाना अभ्यासाच्या तणावातून मुक्त करून मनोरंजनात्मक उपक्रम शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. प्रतिष्ठानने ▶▶ उर्वरित पान २ वर